(8) 2021-22-1
PRJ

ISSN : 0974-3065

प्रथम अंक

# इतिहास दर्पण
# ITIHAS DARPAN

विक्रमाब्ध २०७९, युगांब्ध ५१२४
जानेवारी २०२२

अखिल भारतीय इतिहास संकलन योजना की शोध पत्रिका
आपटे भवन, केशव कुंज, झंडेवाला, नई दिल्ली - ११० ०५५

*RESEARCH JOURNAL OF AKHIL BHARTIYA ITIHAS SANKALAN YOJANA*
*Apte Bhawan, Keshav Kunj, Jhandewala, New Delhi - 110 055*

ISSN : 0974-3065

प्रथम अंक

# इतिहास दर्पण
# ITIHAS DARPAN

विक्रमाब्ध २०७९, युगांब्ध ५१२४
जानेवारी २०२२

ल भारतीय इतिहास संकलन योजना की शोध पत्रिका
भवन, केशव कुंज, झंडेवाला, नई दिल्ली - ११० ०५५
EARCH JOURNAL OF AKHIL BHARTIYA ITIHAS SANKALAN YOJANA
Bhawan, Keshav Kunj, Jhandewala, New Delhi - 110 055

ISSN: 0974 3065


| | | | |
|---|---|---|---|
| | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान | | |
| ३५ | चिमूर क्रांति : एक जन आंदोलन | डॉ. मोहन राजाराम कापगते | २०४-२१० |
| ३६ | काश्मिरच्या विलीनीकरणामध्ये सरदार वल्लभभाई पटेलांचे योगदान - एक अध्ययन | प्रा. डॉ. पी. आर. जुनघरे | २११-२१८ |
| ३७ | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्रातील महिलांचा सहभाग | डॉ.गोरखनाथ पांडुरंगराव फसले | २१९-२२५ |
| ३८ | महाराष्ट्रातील उसतोड कामगार : एक अभ्यास | प्रा. महेन्द्र बन्सीधर वैरागे | २२६-२२९ |
| ३९ | 'सरहद्द गांधी' खान अब्दुल गफार खान | प्रा. आसाराम हरिभाऊ देसाई | २३०-२३५ |
| ४० | चौरीचौरा घटनेचे ऐतिहासिक पुनरावलोकन व भारतीय राष्ट्रीय कांग्रेसची प्रतिक्रिया -एक अभ्यास (चौरीचौरा घटनेच्या शतकपूर्तीच्या विशेष संदर्भात) | श्री. संदीप मारोती महाजन | २३६-२४९ |
| ४१ | भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्रातील वृत्तपत्रांचे योगदान | श्री. दराडे नवनाथ एकनाथ<br>डॉ. सविता गंगाधर मुंढे | २५०-२५६ |
| ४२ | भारतीय स्वातंत्र्य चळवळीत आंबेगाव तालुक्यातील आद्य हुतात्मा बाबू गेनू सैद यांचे योगदान | प्रा. डॉ. नाथा रामभाऊ मोकाटे | २५७-२६२ |
| ४३ | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महाराष्ट्रातील क्रांतीकारकांचे योगदान | प्रा. जितेंद्र दिलीप पगार | २६३-२६९ |
| ४४ | भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील वसंतदादा पाटील यांचे योगदान | डॉ. मधुकर विठोबा जाधव | २७०-२७४ |

ISSN: 0974-3065

# काश्मिरच्या विलीनीकरणामध्ये सरदार वल्लभभाई पटेलांचे योगदान - एक अध्ययन

प्रा. डॉ. पी. आर. जुनघरे (इतिहास विभाग प्रमुख)
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान
महाविद्यालय मेहकर जि. बुलडाणा
मो. 9822530171
parmeshwarjunghare07@gmail.com

**प्रस्तावना :-**

काश्मिर विधात्याला पडलेलं एक सुंदर स्वप्नं! झेलम, सतलज, व्यास व सिंधू यासारख्या बारमाही वाहणाऱ्या नद्या व सुपिक प्रदेश हयामुळे काश्मिरच्या निसर्ग सौंदर्यात भर पडली. केशर, सफरचंद, अक्रोड यासारखी दर्जेदार जिन्नस हया भूमीत उपजतात. ऋतुमानानुसार रंग बदलणारा चिनार वृक्ष, शालीमार निशांत चष्मेशाही उद्याने व शिंपल्यात मोती दिसावा तसे जगप्रसिध्द दाल सरोवर ही काश्मिरची ओळख होय. थंडीच्या दिवसात संपूर्ण काश्मिरवर निसर्ग जणू बर्फाची दुलईच पांघरतो. फक्त निसर्ग सौंदर्यच नाही तर काश्मिरचे रहिवाशीसुध्दा विलक्षण देखणे जणू रूपाची खाणच उर्फी या पर्शियन कवीच्या काव्यपंक्तीव्दारे व्यक्त करावयाचे झाल्यास,

गर फिरदोस बार रूई झमीन अस्त
हमीन अस्त, हमीन अस्त, हमीन अस्त.

या पृथ्वीतलावर स्वर्ग कुठे असेल तर तो हाच आहे, हाच आहे, हाच आहे. परंतु पृथ्वीतलावरील या स्वर्गाच्या सौंदर्याला पाकिस्तानची नजर लागली. ब□जीना हयांना दाल सरोवराचे विलक्षण आकर्षण त्यामुळे काश्मिर प्राप्त करण्यासाठी पाकिस्तानने काश्मिरवर आक्रमण केले. परंतु लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांनी तातडीने घेतलेल्या निर्णयामुळे काश्मिर भारतीय संघराज्यात विलीन झाले.

## 1. ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

निलमत पुराणानुसार कश्यप नावाच्या एका थोर तपस्वी ऋषीने काश्मिर वसविले. कश्यपपुत्र नील काश्मिरचा पहिला राजा होय. त्यांच्या कार्यकाळात काश्मिरची ख्याती सर्वदूर पसरली होती. त्यामुळे अनेकजण काश्मिरमध्ये येवून नवनवीन उद्योगांना बहर आला. कल्हनच्या रजतरंगिनी ग्रंथानुसार काश्मिरचा पहिला ऐतिहासिक राजा गोनंद हा होय. मगध सम्राट जरासंधाचा तो जवळचा नातेवाईक होता. महाभारत काळात गोनंद दुसरा काश्मिरचा शासक होता. तो

ISSN: 0974-3065

अल्पवयीन असल्यामुळे त्याने युध्दात भाग घेतला नाही. मौर्य काळात सम्राट अशोकाने बौध्द धर्माच्या प्रचारार्थ काश्मिर खोऱ्यात अनेक स्तुपांची व विहारांची निर्मिती केली. मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर सुमारे तीनशे वर्षांनी सम्राट कनिष्काच्या कार्यकाळात काश्मिरचे नाव पुन्हा इतिहासाच्या क्षितिजावर झळकले. सम्राट कनिष्काने बौध्द धर्माच्या प्रसारासाठी इ.स. च्या पहिल्या शतकात चौथ्या बौध्द धर्मपरिषदेचे आयोजन केले. त्यानंतर हुनवंशीय राजा मिहिरकुल, राजा संग्रामराज आणि कोटा राणी इत्यादी शासक काश्मिरमध्ये होऊन गेले.

2. **काश्मिरचे इस्लामीकरण :-**

महाभारत काळापासून इ.स. 1324 पर्यंत काश्मिरचे सुत्रे हिंदू शासकाकडे होती. परंतु रिचान नावाच्या तिबेटी तरूणाने कोटाराणी सोबत विवाह करून हिंदू धर्म स्विकारण्याचा प्रयत्न केला परंतु काश्मिरी ब्राम्हणांनी त्याला मान्यता न दिल्यामुळे त्याने इस्लाम धर्माचा स्विकार करून मलीक सद्रुद्दीन हेनाव धारण केले. त्यानंतर सुलतान शमशोद्दीन, शियाबुद्दीन, झैन-उल-अेबिदीन, हैदरशहा, हसरतशहा इत्यादी शासकांनी काश्मिरवर राज्य केले. मुगल काळात बादशहा अकबराने राजा भगवानदासच्या नेतृत्वाखाली काश्मिरवर सैन्य पाठविले. बादशहा शहाजहाने काश्मिरमध्ये शालीमार, चष्मेशाही निशांत इत्यादी उद्याने उभारली. बादशहा औरंगजेबाचे कार्यकाळात काश्मिरी पंडितांचा छळ झाला. त्यांच्या संरक्षणार्थ गेलेले शिख धर्मगुरू तेगबहादूरचा औरंगजेबाने खून केला. त्यानंतर अफगान शासकांची काश्मिरमध्ये सत्ता प्रस्थापित झाली. त्यांचा कार्यकाळ काश्मिरसाठी कर्दनकाळ ठरला.

3. **स्वतंत्र जम्मु-काश्मिर राज्याची स्थापना** (डोगराघराणे इ.स. 1846-1947) :-

मुगल साम्राज्याच्या पतनानंतर राजा रणजित देव नावाच्या डोगरा शासकाने लहान-लहान शासकांना एकत्रित करून जम्मुमध्ये डोगरा राजवट निर्माण केली. पंजाबचा शीख राजा रणजीतसिंह याने जम्मु ताब्यात घेण्यासाठी जम्मुवर स्वारी केली. डोगरा सरदारांनी त्याला प्रखर विरोध केला. त्यामध्ये 16 वर्ष वयाच्या गुलाबसिंग याने अतुलनिय पराक्रम गाजविला. गुलाबसिंगच्या पराक्रमावर खूष होऊन राजा रणजितसिंहाने त्याला आपल्या दरबारात नोकरी दिली. नंतर थोडयात काळात गुलाबसिंग विश्वासू सरदार बनला. पुढे इंग्रज-शिख युध्दात शिखांचा पराभव झाल्यानंतर लाहोरच्या तहानुसार जम्मुकाश्मिरचे राज्य इंग्रजाकडे गेले. परंतु काश्मिरचे भौगोलिक स्थान लक्षात घेऊन इंग्रजांनी अमृतसरच्या तहानुसार 16 मार्च 1846 रोजी जम्मु काश्मिरचे राज्य राजा गुलाबसिंग हयाला 75 लाख रूपयाला विकले. राजा गुलाबसिंग हा जम्मु काश्मिरचा पहिला डोगरा शासक होय. त्यानंतर राजा रणबिरसिंग, राजा प्रतापसिंग, राजा हरिसिंग इत्यादी शासक काश्मिरच्या राजगादीवर येऊन गेलेत. त्यापैकी राजा हरिसिंग याने आपल्या संस्थानात अनेक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. परंतु राजा हरिसिंग काश्मिर संस्थानचे शेवटचे शासक ठरले.

ISSN: 0974-3065

4. **काश्मिर नरेश महाराजा हरिसिंगचा स्वतंत्र राहण्याचा निर्णय :-**

इ.स. 1925 मध्ये महाराजा हरिसिंग यांनी जम्मु-काश्मिर राज्याची सुत्रे आपल्या हातात घेतली. महाराजा हरिसिंग उदारमतवादी विचारधारेचे होते. त्यांनी संस्थानामध्ये अनेक सुधारणा घडवून आणल्या. प्रशासनात लोकप्रतिनिधीचा समावेश केला. आधुनिक सिध्दांतानुसार न्यायदान प्रक्रिया सुरू केली. शाळा, महाविद्यालये, दवाखाने सुरू केली. दुर्गम भागात महामार्गाची निर्मिती केली. पोस्ट तारायंत्रे दुरध्वनीचे जाळे निर्माण केले. वर्तमानपत्रे सुरू केली. एकूण आपल्या राज्याला आधुनिक बनविण्याच्या दिशेने महाराज हरिसिंगाची वाटचाल सुरू होती. म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या स्वातंत्र्य चळवळीला त्यांनी उघड पाठींबा दिला. परंतु जम्मु-काश्मिरच्या राजकारणात शेख अब्दुल्ला नावाच्या नेत्याचा उदय झाला. त्यांनी महाराजा हरिसिंग विरोधात भूमिका घेतली. स्वत:ला 'शेर-ए-काश्मिर' ही उपाधी धारण करून ' जम्मु-काश्मिर नॅशनल कॉन्फरन्स ' नावाचा पक्ष स्थापन केला. पंडित नेहरूंशी त्यांचे जवळचे संबंध होते. पुढे शेख अब्दुल्लाने महाराजाचे विरोधात 'छोडो काश्मिरचा' नारा दिला. डोगरा राजवट संपविण्याचे जनतेला आवाहन केले. त्यामुळे महाराजा हरिसिंगानी शेख अब्दुल्लाचे वर्तन घटनाबाहय असल्यामुळे त्यांना अटक करून तुरूंगात टाकले. यावेळी पंडित नेहरूंनी शेख अब्दुल्लाची पाठराखन केली. त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न केले. या पार्श्वभूमीवर महाराजा हरिसिंगाचे मनात भारताच्या भावी पंतप्रधानाबददल दुरावा निर्माण झाला. हयाच दुराव्यातून महाराजा हरिसिंगानी पुढे स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला.

5. **सत्तांतराचा निर्णय व काश्मिरची स्थिती :-**

18 जूलै 1947 रोजी ब्रिटिश संसदेने भारतीय स्वातंत्र्याचे विधेयक मंजुर केले. त्यानुसार भारतीय संस्थानिकांना स्वयंनिर्णयाचा अधिकार प्रदान करण्यात आला. सत्तांतराच्या प्रक्रियेला प्रारंभ झाल्यानंतर भारतातील सर्व संस्थानिकांना संघराज्यात सामील होण्याचे आवाहन करण्यात आले. परंतु काश्मिरचे महाराजा हरिसिंग हयांनी तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला. आपल्या निर्णयाची माहिती पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल बॅ.जीना व भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन यांना दिली. दोन्ही देशांनी आपल्या स्वतंत्र सार्वभौम राज्याला मान्यता द्यावी अशी विनंती केली. पाकने तांबडतोब महाराजांच्या निर्णयाचे स्वागत करून जम्मु-काश्मिर राज्याशी 'जैसे थे करार' केला. भारत सरकारने मात्र महाराजांना स्पष्टीकरण मागितले. हयाच दरम्यान गर्व्हनर जनरल माऊंटबॅटन यांनी काश्मिर दौऱ्याचे आयोजन करून 15 ऑगष्ट 1947 पुर्वी महाराजांनी भारत किंवा पाकिस्तानात सामिल व्हावे अशा सुचना केल्या. त्याचबरोबर पाकिस्तानात सामील होण्याचा निर्णय घेतल्यास भारतीय नेते हरकत घेणार नाही. परंतु जनमताचा कौल लक्षात घेऊनच काय तो निर्णय घ्यावा, असा सल्ला दिला यावरून गर्व्हनर जनरल माऊंटबॅटनची मानसिकता लक्षात येते.

ISSN: 0974-3065

6. **काश्मिर प्राप्त करण्यासाठी बॅ. जीना यांची व्युहरचना :-**

पाकिस्तानचे शिल्पकार ब जीना हयांना काश्मिरच्या सौंदर्याचे विलक्षण वेड होते. त्यामुळे भारतीय नेते काश्मिर बाबत उदासिन असताना ब जीना मात्र श्रीनगरच्या मुगल उद्यानात बसून काश्मिरच्या सौंदर्याचा आस्वाद घेण्याचे स्वप्न पाहत होते. काश्मिर आपल्या खिशात आहे. फक्त संमतीने किंवा संघर्षाने एवढाच निर्णय व्हायचा होता. त्यासाठी त्यांनी राजा हरिसिंगाचे पंतप्रधान रामचंद काक यांचेशी संधान बांधले. त्यानुसार रामचंद काक हयांनी महाराजांनी स्वतंत्र राहावे अशी मानसिकता तयार केली. हयाच माणसिकतेमधून महाराजांनी पाकिस्तान सोबत 'जैसे थे करार' केला. ब जीना यांनी त्याला तातडीने मान्यता दिली. परंतु रामचंद्र काक पाकिस्तान धार्जिना असल्याचे महाराजाचे लक्षात येताच त्याची हक्कालपटटी करण्यात आली. ब जीना हयांनी हयावेळी काश्मिर मध्ये येण्याचा मनोदय व्यक्त केला. परंतु महाराजांनी त्याला परवानगी दिली नाही. महाराजांकडून अपेक्षित प्रतिसाद येत नसल्यामुळे ब जीना यांनी महाराजांनी काश्मिर पाकिस्तानात विलिन करण्यासाठी काश्मिरची आर्थिक कोंडी केली.

7. **पाकिस्तानचे कारस्थान 'ऑपरेशन गुलमर्ग' :-**

संपूर्ण भारतात स्वातंत्र्याचा जल्लोष साजरा होत असतांना त्या जल्लोषाबरोबर फाळणीच्या वेदना असहय होवून शिगेला पोहचल्या असताना भारतीय राज्यकर्त्यांच्या नकळत रावळपिंडीत एक पाताळयंत्री कारस्थान शिजत होते. महाराजा हरिसिंगाची तटस्थ् भूमिका लक्षात घेऊन दुसऱ्या आघाडीवर पाकिस्थानची युध्दतयारी वेगाने सुरू होती. मेजर जनरल अकबर खान याच्या मार्गदर्शनाखाली कारवाईची योजना तयार होत होती. त्याला लागणारे अर्थबळ व संख्याबळ उपलब्ध करून देण्याची हमी पाक सरकारने घेतली होती. मेजर जनरल अकबरखानने 'जनरल तारिक' हे टोपणनाव धारण करून श्रीनगरवर हल्ला करून एका दिवसात ते जिंकावयाचे आणि जम्मु-काश्मिर पादाक्रांत करून पाकिस्थानचा अविभाज्य भाग बनवायचे अशी महत्त्वाकांक्षी योजना आखली होती. त्यानुसार त्या मोहिमेसाठी जनरल तारिकने वायव्य सरहद्दीवरील टोळीवाल्यांची भरती केली. टोळीवाले व अकबरखान यांच्यात अलिखित करार झाला होता. त्यानुसार 22 ऑक्टोबर 1947 रोजी मोहिमेचा प्रारंभ झाला. काश्मिरचा पहिला बालेकिल्ला डोमेल सहज काबीज झाले. जनरल तारिक श्रीनगर पासून 100 मैल अंतरावर आला. त्यासाठी अवघे 10 तास लागणार होते. त्याची भरधाव वेगाने श्रीनगरच्या दिशेने आगेकुच सुरु झाली.

8. **जम्मु-काश्मिर राज्याची भारत सरकारकडे मदतीसाठी विनंती :-**

जनरल तारिकच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानी टोळीवाल्यांनी श्रीनगरच्या दिशेने वाटचाल केल्याचे लक्षात घेवून महाराजा हरिसिंग यांनी तातडीने भारत सरकारला मदत करण्यासाठी विनंती करणारे पत्र दि. 23/10/1947 रोजी पंतप्रधान मेहरचंद महाजन यांचे मार्फत पाठविले.

ISSN: 0974-3065

सरदार वल्लभभाई पटेलांच्या नावाने पाठविलेल्या हया पत्रात 'शत्रूने आम्हाला सर्व बाजूने घेरलेले असून आमची मुस्लीम सेना व पोलिस यांनी आम्हाला धोका दिला असून राज्याची स्थिती गंभीर असल्याचे हया पत्राव्दारे त्यांनी सरदार पटेलांना सांगितले.'

**9. राजधानी दिल्ली व श्रीनगरमधील घडामोडी :-**

काश्मिरचे महाराजा हरिसिंग यांनी भारत सरकारकडे मदत करण्यासाठी विनंती केल्यानंतर राजधानी दिल्लीमध्ये दिनांक 24 ऑक्टोबर 1947 रोजी काश्मिरमधील परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी मंत्रीमंडळाच्या संरक्षण समितीची बैठक आयोजित करण्यात आली. हया बैठकीमध्ये लॉर्ड माऊंटबटन यांनी काश्मिरमधील परिस्थिती बाबत सविस्तर माहिती घेतल्याशिवाय कोणताही निर्णय घेणे उचित ठरणार नाही अशी भूमिका घेतल्यामुळे सरदार पटेलांनी संस्थांनी खात्याचे सचिव व्हि.पी. मेनन हयांना तातडीने श्रीनगरला पाठविण्याचा निर्णय घेतला. सरदार पटेलांच्या आदेशानुसार मेनन विशेष विमानाने 25 ऑक्टोबर 1947 रोजी तातडीने श्रीनगरला पोहचले. महाराजा हरिसिंग हयांची भेट घेऊन त्यांना श्रीनगर सोडण्याचा सल्ला दिला. त्यानुसार महाराजांनी आपला काफिला जम्मुकडे रवाना केला. काश्मिरमधील वर्तमान परिस्थितीचा आढावा घेऊन व्ही.पी. मेनन राजधानी दिल्लीत जम्मु-काश्मिर राज्याचे पंतप्रधान मेहरचंद महाजन यांचेसह दाखल झाले. त्यांनी पाकिस्तानी घुसखोरांपासून श्रीनगर वाचविण्यासाठी तातडीने पाउले उचलण्याची गरज प्रतिपादन केली. मेहरचंद महाजन हयांनी सुध्दा मदतीची विनंती केली. परंतु लॉर्ड माऊंटबटन हयांनी काश्मिरला मदत करण्याबाबत आक्षेप घेतला. त्यांच्या मते, अद्यापपर्यंत महाराजा हरिसिंगाने भारत किंवा पाकिस्तानमध्ये सामिल होण्याचा निर्णय घेतला नाही. त्यामुळे भारत सरकारला सैन्य पाठविता येणार नाही. घटनात्मकदृष्टया ते योग्य नाही त्यामुळे 26 ऑक्टोबर 1947 रोजी सचिव व्हि. पी. मेनन व मेहरचंद महाजन जम्मुला रवाना झाले. 1935 च्या कायद्यानुसार संस्थानिकांसाठी निर्धारित करण्यात आलेल्या विलीनीकरण प्रस्तावावर महाराजा हरिसिंगांनी स्वाक्षरी केली. (26.10.1947)

**10. काश्मिरमध्ये सेना पाठविण्याचा निर्णय :- (सरदार पटेलांची खंबीर भूमिका 26/10/1947)**

विलीनीकरण प्रस्तावावर महाराजा हरिसिंगाची स्वाक्षरी पार पडल्यानंतर सचिव मेनन तातडीने दिल्लीला रवाना झाले. सरदार पटेल विमानतळावर येऊन मेननची वाट पाहत होते. त्यांच्यासह पटेल सरंक्षण समितीच्या बैठकीसाठी दाखल झाले. लॉर्ड माऊंटबटनच्या अध्यक्षतेखाली बैठकीला सुरूवात झाली. परंतु पंडित नेहरू, संरक्षणमंत्री बलदेवसिंह सेनापती रॉयबुचर व सैन्याचे सर्व अधिकारी बैठकिला उपस्थित होते. श्रीनगरला तातडीने सैन्य पाठविण्यासंदर्भात चर्चा सुरू झाली. परंतु सेनापती रॉयबुचरच्या मते माझ्याकडे उपलब्ध असलेली साधनसामुग्री खूप कमी आहे. त्यामुळे जम्मु-काश्मिर राज्याला लष्करी मदत करणे

शक्य नाही. लॉर्ड माऊंटबटन यांनी सुध्दा मुद्दाम लष्कर प्रमुखाचे समर्थन केले. पंडित नेहरूंची अवस्था अवघडल्यासारखी झाली. बैठकीत लाचारी व निराशेचे वातावरण निर्माण झाले. अशा वातावरणा सरदार पटेल उपस्थित मान्यवरांचे विचार शांतपणे ऐकत होते. बैठकीत शांततेचे वातावरण असताना पटेलांनी आपले मौन सोडले. त्यांच्या स्पष्ट, कठोर व आत्मविश्वासपूर्ण आवाजाने सर्वांचे लक्ष आकर्षित केले. त्यावेळी सरदार पटेल म्हणाले, " सेनापती महोदय साधन सामग्री असो किंवा नसो कोणत्याही परिस्थितीत काश्मिरचे रक्षण झालेच पाहिजे. परिणाम काहीही होवो तुम्ही तुमचे काम करा. सरकार तुम्हाला पूर्ण मदत करण्यासाठी तत्पर आहे. त्यामुळे हे काम झालेच पाहीजे." सरदार पटेलांच्या या आत्मविश्वासपूर्ण आवाजामुळे बैठकीत नवचैतन्य निर्माण झाले. त्यानंतर सरदार पटेल बैठकीतून उठत असताना म्हणाले, 'उद्या सकाळपर्यंत विमानाने सैन्य व साधनसामग्री पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.' सरदार पटेलांच्या संरक्षण समितीमधील खंबीर भूमिकेमुळे वातावरण पुर्ण बदलले आणि श्रीनगरला सैन्य पाठविण्याच्या हालचालीला वेग आला.

**11. भारतीय सैन्य काश्मिरमध्ये दाखल :-**

संरक्षण विषयक समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार काश्मिरमध्ये सैन्य पाठविण्यासाठी राजधानी दिल्लीत जोराने चक्रे फिरू लागली. स्वातंत्र्यपूर्व काळात काश्मिरमध्ये जाण्यासाठी जे दोन स्थलमार्ग होते ते दोन्ही पाकिस्तानमध्ये गेल्यामुळे एकच मार्ग शिल्लक होता. परंतु तो खडतर असल्यामुळे त्या रस्त्यावरून प्रवास करून काश्मिरमध्ये पोहचणे शक्य नव्हते. त्यामुळे एकच पर्याय होता हवाई मार्ग. सरदार पटेलांनी आकाशवाणीवरून सर्व खाजगी कंपन्यांना आपआपली विमाने तातडीने दिल्लीला पाठविण्याचे आवाहन केले. सरदार पटेलांच्या आदेशानुसार दिनांक 27 ऑक्टोबर 1947 रोजी सकाळी एकानंतर एक विमानांनी दिल्लीच्या सफदरजंग विमानतळावरून श्रीनगरच्या दिशेने उडडाण केले. कर्नल रणजितरॉयच्या नेतृत्त्वाखाली शीख बटालीयनने श्रीनगर विमानतळाचा ताबा घेतला पुढील मोर्चेबांधणीसाठी बारामुल्लाचे दिशेने आगेकूच सुरू केली.

**12. सरदार पटेल युध्दभूमीवर :-**

लेफटनंट कर्नल रॉयच्या नेतृत्त्वाखाली भारतीय सैन्याची पहिली तुकडी श्रीनगरमध्ये दाखल झाली. परंतु शत्रु सैन्य मोठया प्रमाणावर होते. त्यांना तोंड देतांना कर्नल रॉय धारातिर्थी पडले. मेजर सोमनाथ शर्मा नावाचा तरणाबांड लष्करी अधिकारीसुध्दा तोफेच्या गोळयाचा बळी ठरला. शत्रूसैन्य श्रीनगर पासून फक्त ९ मैल अंतरावर होते. 161 व्या ब्रिगेडचे प्रमुख एल.पी. सेन परिस्थितीवर नियंत्रण ठेवून होते. परंतु शत्रुची ताकद जास्त असल्यामुळे त्यांना आणखी मदतीची

 ISSN: 0974-3065

नितांत आवश्यकता होती. परंतु ब्रिगेडियर बी.एम.कौल यांनी प्रधानमंत्री नेहरूंना काश्मिर शांत आहे अशी चुकीची माहिती दिल्यामुळे राजधानी दिल्लीत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. राजधानी दिल्लीतील संभ्रमाचे वातावरण युध्दभूमीवरील जवानांसाठी धोकायदायक होते. त्यामुळे परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी ४ नोव्हेंबर 1947 रोजी सरदार पटेल सरंक्षणमंत्र्यांसह श्रीनगरला रवाना झाले. ब्रिगेडीयर सेन सोबत सविस्तर चर्चा केली. श्रीनगरला वाचविण्यासाठी अतिरिक्त सैन्य पाठविण्याचा निर्णय घेतला सरदार पटेलांच्या श्रीनगर भेटीमुळे संभ्रमाचे वातावरण दूर झाले. लष्करी अधिकाऱ्याचे मनोबळ वाढले. त्याचबरोबर अतिरिक्त रसद प्राप्त झाल्यामुळे भारतीय सैन्याने पाकिस्तानी सैन्याचा चोख समाचार घेतला. योग्यवेळी मदत प्राप्त झाल्यामुळे घुसखोरांच्या तावडीत जाण्यापासून श्रीनगर वाचले. अबोटाबाद येथे येवून बसलेले ब□जीनाचा भ्रमनिरास झाला.

**सारांश :-**

काश्मिर नरेश महाराजा हरिसिंग यांचा सुरूवातीपासून भारतीय स्वातंत्र्यलढयाला पाठिंबा होता. परंतु जम्मु-काश्मिरच्या राजकारणात शेख अब्दुल्ला नावाच्या नेत्याचा उदय व त्याला असलेला नेहरूंचा पाठिंबा हयामुळे महाराजा हरिसिंग हयांनी भारतीय संघराज्यात सामिल न होता स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. परंतु ब□जीना हयांनी राजा हरिसिंगाच्या हया निर्णयाचा फायदा घेवून काश्मिर प्राप्त करण्यासाठी टोळीवाल्यांमार्फत काश्मिरवर आक्रमण केले. त्या पार्श्वभूमीवर जम्मु-काश्मिर पाकिस्तानच्या तावडीतून वाचवून भारतीय संघराज्यात विलीन करण्यासाठी सरदार पटेलांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. संस्थानविषयक खात्याची जबाबदारी स्विकारल्यानंतर सरदार पटेलांनी सुरूवातीपासूनच काही धोरणात्मक निर्णय घेतले. जम्मु-काश्मिरचे प्रधानमंत्री काक हयांना पत्र पाठवून भारतीय संघराज्यात विलीन होण्यास सांगितले. महाराजा हरिसिंग यांना पत्र पाठवून त्यांचे मनातील संभ्रम दूर केले. शेख अब्दुल्ला यांना असलेला जनाधार लक्षात घेऊन त्यांची तुरूंगातून सुटका केली. संपर्क यंत्रणेत सुधारणा घडवून आणल्या. महाराजा हरिसिंग हयांना श्रीनगर सोडून जम्मुला जाण्याचे आदेश दिले. विलीनीकरण प्रस्तावावर महाराजा हरिसिंग यांची स्वाक्षरी घेण्यासाठी सचिव मेनन हयांना तातडीने जम्मुला पाठविले. संरक्षण समितीच्या बैठकीत निर्णायक भूमिका घेतली. युध्दभूमीला प्रत्यक्ष भेट देऊन सैनिकांचे मनोबल वाढविले. एकूण सरदार पटेलांचे निर्णायक व खंबीर भूमिकेमुळे काश्मिरचे भारतीय संघराज्यात विलीनकरण होवून पाकिस्तानी घुसखोरापासून संरक्षण झाले.

 ISSN: 0974-3065

**संदर्भ ग्रंथसुची :-**

१) दाणी रविंद्र, मिशन काश्मिर, अमेय प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २०१०.

२) वैद्य मा.गो. काश्मिर समस्या आणि समाधान, लाखे प्रकाशन नागपुर, प्रथम आवृत्ती २००५.

३) वी. शंकर (संपादक) सरदार पटेल चुना हुआ पत्रव्यवहार, 1945-50 खंड 1 नवजीवन मुद्रनालय, अहमदाबाद पुनर्मुद्रण २०११.

४) चोपडा पी.एन. सरदार पटेल काश्मिर एवं हैदराबाद, प्रभात प्रकाशन नवी दिल्ली, २०१०.

५) B. Krishna INDIA'S BISMARK Sardar Vallabhabhai Patel, Iudus Source Books, Malbar Hill Mumbai, 2010.

६) Durgadas (Editor) Sardar Patel's Correspondence Vol.1 1945-50, Navjivan Publishing house Ahamadabad 1974.

७) Menon V.P. The Story of intergration of the Indian states, Longmans Green and co, Londan, 1957.

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana